“आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण-शिल्पकार चरित्रकोश” ह्या साप्ताहिक विवेकच्या संशोधन प्रकल्पास अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग

शासन निर्णय क्रमांकः मसाअ-२०१७/प्र.क्र.१२६/२०१७/भाषा-३,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**तारीख: २३ फेब्रुवारी, २०१८.**

वाचा :-

वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पूरक-२०१७/प्र.क्र.३३५/अर्थ-३, दिनांक २९ डिसेंबर, २०१७.

प्रस्तावना :-

एकोणिसावे व विसावे शतक हे भारताचे प्रबोधनपूर्व मानले जाते. आपली प्राचीन संस्कृती आणि पाश्चात्य देशातून आलेली आधुनिकता यांच्या परस्पर संवादातून आणि समन्वयातून जीवनाच्या विविध क्षेत्रात मूलभूत परिवर्तन घडले, या परिवर्तनात महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहीला आहे. ज्या व्यक्तींनी मराठी माणसाच्या सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक परिसरात आपल्या कर्तृत्वाने सकारात्मक परिवर्तन घडविले अशा ज्ञात-अज्ञात व्यक्तिंची चरित्रे जनसामान्य माणसापर्यंत पोहोचली जाणे ही काळाची गरज आहे. या उद्देशाने साप्ताहिक विवेक, प्रभादेवी, मुंबई यांनी “आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण-शिल्पकार चरित्रकोश” हा संशोधन प्रकल्प हाती घेतला आहे. ह्या संशोधन प्रकल्पास अर्थसहाय्य देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य मराठी विकास संस्थेकडून दि.२२.११.२०१७ च्या पत्रानुसार प्राप्त झाला होता. सदर प्रकल्पास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

साप्ताहिक विवेक, प्रभादेवी, मुंबई यांनी “आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण-शिल्पकार चरित्रकोश”हा संशोधन प्रकल्प हाती घेतला आहे. हा प्रकल्प राज्यातील सर्व विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक यांना मार्गदर्शक असून तरूण पिढीला प्रेरणादायी ठरणारा आणि साहित्य समृध्दीसाठी उपयुक्त ठरणारा आहे. या संशोधन प्रकल्पास रूपये पाच कोटी अर्थसहाय्य आवश्यक आहे. सदर प्रकल्पास राज्य मराठी विकास संस्थेच्या प्रकल्प व वित्त समितीची तसेच कार्यकारी समितीची मान्यता घेण्यात आलेली असल्याने त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. रूपये पाच कोटी इतक्या खर्चाच्या रकमेपैकी पहिला हप्ता म्हणून रूपये दोन कोटी छत्तीस लक्ष इतके अर्थसहाय्य मंजूर करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०१७ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-६२) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग-४ दिनांक २१ डिसेंबर, २०१७ अन्वये रूपये दोन कोटी छत्तीस लक्ष फक्त अनुदानास मान्यता दिली आहे. वित्त विभाग शासन परिपत्रक

क्र.पूरक-२०१७/प्र.क्र.३३५/अर्थ-३, दिनांक २९ डिसेंबर, २०१७ च्या अनुषंगाने रूपये दोन कोटी छत्तीस लक्ष च्या ७० टक्केच्या मर्यादेत अनुदान वितरण्यास नियोजन विभाग व वित्त विभागाने मान्यता दिली आहे.

३. पूरक मागणीव्दारे मंजूर करण्यात आलेले रु.२ कोटी ३६ लक्ष (अक्षरी रुपये दोन कोटी छत्तीस लक्ष फक्त) च्या ७० टक्के रू.१,६५,२०,०००/- (अक्षरी रूपये एक कोटी पासष्ट लक्ष वीस हजार फक्त) इतके अतिरिक्त अनुदान राज्य मराठी विकास संस्थेस वितरित करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

१) "आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण-शिल्पकार चरित्रकोश" या संशोधन प्रकल्पाचे काम तीन वर्षात पूर्ण करण्याकरीता साप्तहिक विवेक यांच्या समवेत राज्य मराठी विकास संस्था यांनी सांमजस्य करार करावा व सदर कराराची स्वाक्षरीची प्रत शासनास सादर करावी.

२) करारामध्ये कामाचे टप्पे ठरवून सदर प्रकल्पासाठी मंजूर निधीचे टप्पानिहाय विभाजन स्पष्ट करावे. प्रत्येक टप्प्यासाठी त्यानुसार त्यात्या टप्प्यावरील कामाची पूर्तता झाली आहे. याची खात्री करून साप्ताहिक विवेक यांना निधीचे वितरण करावे.

३) करारपत्रामध्ये प्रकल्प आढाव्याचे वेळापत्रक निश्चित करावे व मंडळाच्या बैठकीत याचा वेळोवेळी आढावा घ्यावा.

४) तीन वर्षाच्या कालमर्यादेच्या बाहेर प्रकल्पाचे काम प्रलंबित राहणार नाही. याबाबत राज्य मराठी विकास संस्थेने दक्षता घ्यावी.

५) ज्या उद्दीष्टासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे, त्याच उद्दीष्टासाठी वापरला जाईल याची राज्य मराठी विकास संस्थेने पुरेपुर दक्षता घ्यावी.

६) मराठी वाचकांना सदर माहिती राज्य शासनाचे / संस्थेचे संकेतस्थळ, संचयिका (सी.डी.), मराठी विकिपिडीया व अन्य इलेक्ट्रॉनिक माध्यमाव्दारे मोफत उपलब्ध करून देण्यात यावी.

७) प्रस्तुत प्रकल्पाकरीता साप्ताहिक विवेक यांनी केलेल्या खर्चाचे विनियोजन प्रमाणपत्र राज्य मराठी विकास संस्थेने प्राप्त करून घ्यावे. त्याची प्रत शासनास सादर करावी.

८) साप्ताहिक विवेक, प्रभादेवी, मुंबई यांनी त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीसंबंधात मागील तीन वर्षाचा सनदी लेखापालाने प्रमाणित केलेला ताळमेळ शासनाच्या अधिपत्याखालील राज्य मराठी विकास संस्थेकडे सादर करावा. सदर ताळमेळ तपासण्याची जबाबदारी राज्य मराठी विकास संस्थेची राहील.

९) "आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण-शिल्पकार चरित्रकोश" या संशोधन प्रकल्पास शासनाकडून मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याबाबतची कागदपत्रे व हिशोब महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई किंवा त्यांचे अधिकारी यांना तपासण्याचा अधिकार असून त्यांनी मागणी केल्यास सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीसाठी साप्ताहिक विवेक, प्रभादेवी, मुंबई यांनी सादर करावीत.

४. यासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक झेडएफ-०२, (०२) योजनातंर्गत योजना, (०२)(०१) राज्य मराठी विकास संस्था, ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२०५ ३२०५) या लेखाशीर्षाखाली मंजूर करण्यात येणाऱ्या अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्राप्रमाणे भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.१४९/१७/१४४३, दि.२८.११.२०१७ व अनौपचारिक संदर्भ क्र.१०/१८/१४४३, दि.१५.०१.२०१८ व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.५९०/२०१७/व्यय.४, दि.११.१२.२०१७, अनौपचारिक संदर्भ क्र.४८/२०१८/व्यय.४, दि.३१.०१.२०१८ व अनौपचारिक संदर्भ क्र.९५/अर्थ.१४, दि.०७.०२.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२३११४२२५०१३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uday Ganpat Gawas

Digitally signed by Uday Ganpat Gawas
DN: CN = Uday Ganpat Gawas, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Marathi Language
Date: 2018.02.23 15:06:48 +05'30'

**( उदय ग. गवस )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
२. महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
५. मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
६. मा.मंत्री (मराठी भाषा) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (वित्त) / प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) / सचिव (व्यय) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९. प्रभारी संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
१०. वित्त विभाग (कार्यासन-व्यय-४ / अर्थसं-१४), मंत्रालय, मुंबई,
११. नियोजन विभाग, कार्यासन-१४४३, मंत्रालय, मुंबई,
१२. अवर सचिव / कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. भाषा-३ (संग्रहार्थ).